स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड अंतर्गत सामाजिक शास्त्रे विद्या शाखेतील
इतिहास विषयातील पीएच.डी पदवीकरिता सादर करण्यात येणाऱ्या
शोधनिबंधाचा आराखडा.

“ लातूर जिल्ह्यातील सामाजिक, शैक्षणिक व धार्मिक चळवळीचा इतिहास "

संशोधक विद्यार्थी

श्री. पांचाळ दत्तात्रय अंबादास

(एम.ए. सेट एम.एड.सेट)
मु. पो. शिवली ता. औसा जि. लातूर

संशोधन मार्गदर्शक

डॉ. सुरेश नांदे

(एम.ए.एम. फिल. पीएच. डी.)
इतिहास विभागप्रमुख
शिवाजी महाविद्यालया रेणापूर जि.लातूर

लातूर जिल्ह्यातील सामाजिक, शैक्षणिक व धार्मिक चळवळीचा इतिहास

लातूर जिल्ह्याला फार प्राचीन सामाजिक, सांस्कृतिक व ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे. लातूर जिल्ह्यातील मानवी अस्तित्वाच्या खुणा अश्मयुगात पर्यंत जातात. राष्ट्रकूट कालखंडात लातूर नगरी राष्ट्रकूटांची राजधानी होती.लातूर जिल्ह्याला स्वातंत्र्यपूर्व काळापासून सामाजिक व राजकीय चळवळींचा वारसा लाभलेला आहे. मराठवाड्यावर निजामाचे सव्वा दोनशे वर्षे राज्य होते. लातूर परिसरातील अनेक वीरांनी निजामच्या विरोधात संघर्ष केला आहे. निजाम विरोधी वातावरण निर्माण करण्यात व या परिसराला स्वातंत्र्याचे महत्त्व पटवून देण्यात आर्य समाज चळवळीचे मोठे योगदान राहिले आहे. आर्य समाजाच्या जनमानसावरील प्रभावातून समाजात सामाजिक अभिसरणाची प्रक्रिया घडून आली.

मराठवाड्याच्या दृष्टीने विचार केल्यास लातूर जिल्हा अल्पावधीतच विकसित झालेला जिल्हा आहे. लातूर हे विविध चळवळींचे ऊर्जा केंद्र म्हणून ओळखले जाते. सामाजिक, सांस्कृतिक, राजकारण, शिक्षण, साहित्य, कला, क्रीडा इत्यादी क्षेत्रात लातूरचा दबदबा देशभर दिसून येतो. विद्यापीठ नामांतर चळवळीत लातूर जिल्ह्याचे योगदान महत्वाचे आहे. तसेच डाव्या विचारसरणीचाही प्रभाव जिल्ह्यात दिसतो. शेतकरी व कामगार यांनी वेळोवेळी केलेल्या आंदोलने, मोर्चे, संप यातून चळवळी जिवंत ठेवल्या.

लातूर जिल्ह्याला वेगळी अशी शैक्षणिक ओळख आहे. लातूर पॅटर्न हा शब्दप्रयोग संपूर्ण महाराष्ट्राला परिचित झाला आहे. हा शैक्षणिक विकास होण्यास अनेक घटकांचे योगदान कारणीभूत आहे. वरील विविध चळवळींचा प्रभाव लातूर जिल्ह्याच्या जडणघडणीमध्ये दिसून येतो. या चळवळींचा अभ्यास प्रस्तावित प्रकरणात करण्यात येणार आहे.

संशोधनाची उद्दिष्टे

प्रस्तावित विषयाचे संशोधन करीत असताना खालील उद्दिष्टे समोर ठेवून विषयाची मांडणी करण्यात येईल.

१. लातूर जिल्ह्यातील चळवळीच्या पार्श्वभूमीची मांडणी करणे.

२. विद्यापीठ नामांतर लढ्यातील लातूर जिल्ह्याच्या सहभागाचा इतिहास मांडणे.

३. लातूर जिल्ह्यातील आर्य समाजाच्या सामाजिक व राजकीय योगदानाची मांडणी करणे.

४. लातूर जिल्ह्यातील डाव्या विचासरणीच्या प्रभावाचा इतिहास मांडणे.

५. लातूर जिल्ह्याच्या शैक्षणिक चळवळीचा इतिहास मांडणे.

६. लातूर जिल्ह्यातील नामांतर लढ्यातील विविध मतप्रवाहांची मांडणी करणे.

७. शैक्षणिक विकासात योगदान दिलेल्या घटकांचा इतिहास मांडणे.

गृहितके

प्रस्तावित विषयाचे संशोधन करत असताना संशोधनासाठी आवश्यक असणारी गृहितके खालील प्रमाणे मांडण्यात आलेली आहेत.

१. लातूर जिल्ह्याच्या जडणघडणीत विविध चळवळींचे महत्वाचे योगदान आहे.

२. आर्य समाजाचा लातूर जिल्ह्याच्या जनमानसावर प्रभाव आहे.

३. विद्यापीठ नामांतर चळवळीत लातूर जिल्ह्यातील सहभाग महत्वाचा होता.

४. लातूर जिल्ह्यातील चळवळीवर डाव्या विचासरणीचा प्रभाव आहे.

५. लातूर जिल्ह्यातील शैक्षणिक चळवळीस विविध घटकांचे योगदान महत्त्वाचे आहे.

६. आर्य समाजाचे लातूर जिल्ह्यातील सामाजिक योगदान महत्वाचे आहे.

संशोधन विषयाची व्याप्ती व कालखंड

प्रस्तावित संशोधनात लातूर जिल्ह्यातील आधुनिक कालखंडातील निवडक चळवळींच्या इतिहासाची मांडणी करण्यात येईल.

संशोधन पद्धती

प्रस्तावित विषयाचे संशोधन करीत असताना उद्दिष्टे व गृहीतकांच्या आधारे उपलब्ध असलेल्या अप्रकाशित, प्रकाशित तसेच प्राथमिक व दुय्यम संदर्भ साधनांचे परीक्षण करून संशोधन विषयाची मांडणी करण्यात येईल. समकालीन संदर्भ ग्रंथ, मासिके, साप्ताहिके, नियतकालिके, वृत्तपत्रातील लेख, मुलाखती इत्यादी साधनांचा आधार घेऊन ऐतिहासिक व विश्लेषणात्मक पद्धतीने प्रस्तावित विषयावर संशोधन करण्यात येईल.

संशोधन विषयाची निवड व महत्त्व

लातूर जिल्हा निजाम राजवटीत राहिल्यामुळे महाराष्ट्राच्या तुलनेत शिक्षणाचा आणि आधुनिकतेचा परिचय खूप उशीर झाला. लातूर जिल्ह्याच्या जडणघडणीमध्ये विविध चळवळींचे योगदान महत्त्वाचे आहे. या चळवळीच्या माध्यमातून लातूर जिल्ह्याच्या सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रात वैचारिक परिवर्तन घडण्यास मदत झाली. त्यामुळे अशा चळवळींचा इतिहास मांडणे महत्वाचे आहे. तसेच संशोधनामध्ये स्थानिक इतिहासाच्या लेखनाला महत्त्वाचे स्थान आहे. म्हणून संशोधनासाठी सदर विषयाची निवड केलेली आहे.

प्रस्तावित प्रकरण रचना

प्रकरण पहिले :- पार्श्वभूमी

या प्रस्तावित पहिल्या प्रकरणात लातूर जिल्ह्याचा प्राचीन इतिहास, अश्मयुगातील खुणा, विविध राजवंश यांची सत्ता यात सातवाहन, वाकाटक, राष्ट्रकूट इ. ते निजाम यांचा इतिहास मांडण्यात येईल. तसेच लातूर जिल्ह्याची जडणघडण याची मांडणी करण्यात येईल. जिल्ह्यातील विविध चळवळीस कारणीभूत घटक यात विविध आंदोलने यांची मांडणी करण्यात येईल. या प्रकरणात लातूर जिल्ह्याची सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक व भौगोलिक पार्श्वभूमी यांचा इतिहास मांडण्यात येईल.

प्रकरण दुसरे :- विद्यापीठ नामांतर चळवळ

प्रस्तावित प्रकरणात विद्यापीठ नामांतर चळवळीचा इतिहास मांडण्यात येईल. यात नामांतर लढ्याची पार्श्वभूमी, मागणी याची मांडणी करण्यात येईल. तसेच लातूर जिल्ह्यातील संदर्भाने नामांतर चळवळीचा इतिहास मांडण्यात येईल. प्रस्तावित प्रकरणात लातूर जिल्ह्यातील नामांतर लढा चळवळीची केंद्र, नामांतर चळवळीतील लातूर जिल्ह्याचे योगदान यांचा इतिहास मांडण्यात येईल. लातूर जिल्ह्यातील नामांतर चळवळीतील आंदोलने, मोर्चे, तसेच नामांतर विरोधी मोर्चे, दलितांवरील अत्याचार, आर्थिक नुकसान, नामांतर विरोधी तत्वज्ञान, नामांतरासंबंधी विविध मतप्रवाह यांचीही मांडणी करण्यात येईल.

प्रकरण तिसरे :- कम्युनिस्टांची चळवळ

प्रस्तावित प्रकरणात लातूर जिल्ह्यातील कम्युनिस्ट चळवळची मांडणी करण्यात येईल. हैदराबाद मुक्ती संग्रामातील कम्युनिस्टांचा सहभाग, कम्युनिस्ट चळवळीचे या लढ्यातील वेगळेपण, हिंदू-मुस्लिम लढा न मानता जमीनदारी विरुद्ध सरंजामशाही लढा असा या लढ्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन. सन 1952, 57 सालच्या निवडणुकीत डाव्या पक्षाच्या जिल्ह्यातील उमेदवाराचा प्रचार याचा इतिहास या प्रकरणात मांडण्यात यईल.

संयुक्त महाराष्ट्र चळवळ, गोवा मुक्ती आंदोलन या चळवळींमध्ये कम्युनिस्ट पक्षाचे कार्य जिल्ह्यातील लातूर, अहमदपूर, निलंगा, औसा या ठिकाणी आढळून येते. जिल्ह्यामध्ये सन 1970 ते 80 या दशकांमधील कामगार व शेतकरी आंदोलने, SFI विठ्ठल मोरे या सर्वांचा इतिहास या प्रकरणात मांडण्यात येईल.

प्रकरण चौथे :- शैक्षणिक चळवळ

प्रस्तावित प्रकरणात विविध शिक्षण संस्थांचा इतिहास, त्यांचे शैक्षणिक कार्य याची मांडणी करण्यात येईल. संपूर्ण महाराष्ट्राला परिचित असणारा लातूर पॅटर्न याचे उच्च माध्यमिक स्तरावरील योगदान याची मांडणी करण्यात येईल. शैक्षणिक विकासास पूरक असणाऱ्या शिक्षण पूरक संस्था यांचे योगदान या प्रकरणात मांडण्यात येईल. लातूर जिल्ह्यातील शिक्षण क्षेत्रात योगदान दिलेल्या व्यक्ती व त्यांचे कार्य याचा सविस्तर इतिहास या प्रकरणात मांडण्यात येईल.

प्रकरण पाचवे :- आर्य समाजाची चळवळ

प्रस्तावित प्रकरणात आर्य समाजाची स्थापना,लातूर जिल्ह्यातील आर्य समाजाचे नेतृत्व, प्रसार व प्रचार यांची मांडणी करण्यात येईल. हैदराबाद स्वातंत्र्य संग्रामातील लातूर जिल्ह्यातील आर्य समाजाचा सहभाग याचा इतिहास या प्रकरणात मांडण्यात येईल. तसेच लातूर जिल्ह्यातील आर्य समाजाच्या चळवळीचे धार्मिक, सामाजिक, राजकीय व अध्यात्मिक क्षेत्रातील योगदान याची मांडणी करण्यात येईल. जिल्ह्यात आर्य समाजाच्या चळवळीतून सामाजिक व शैक्षणिक कार्यास प्रेरणा मिळाली यात विविध संस्थांच्या स्थापनेत आर्यसमाजी तसेच आर्य समाजाच्या विचारांचा प्रभाव यात दयानंद महाविद्यालय, राजस्थानी विद्यालय लातूर, शामलाल हायस्कूल उदगीर संस्थांची स्थापना यांचा इतिहास मांडण्यात येईल. आर्य समाजाद्वारे राबवण्यात येणारे अनेक जनोपयोगी उपक्रम, तरुण वर्गाचा शारीरिक व मानसिक विकास यासाठी व्यायाम, कुस्ती, दांडपट्टा, दंडबैठका, तलवारबाजी इत्यादी द्वारे विकास या सर्वांचा इतिहास या प्रकरणात मांडण्यात येईल.

प्रकरण सहावे :- उपसंहार

या संशोधन विषयांमध्ये प्रकरण एक मध्ये पार्श्वभूमी, दुसऱ्या प्रकरणांमध्ये नामांतर चळवळ, तिसऱ्या प्रकरणात कम्युनिस्ट चळवळ, चौथ्या प्रकरणात शैक्षणिक चळवळ आणि पाचव्या प्रकरणात आर्य समाजाची चळवळ अशी मांडणी करण्यात येईल. या सर्व प्रकरणाच्या माध्यमातून लातूर जिल्ह्यातील चळवळींचा इतिहास याविषयी मूल्यमापन करून निष्कर्षांची मांडणी करण्यात येईल.

संदर्भसूची

१. आगलावे प्रदीप, संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, नागपूर, २०००.

२. गव्हाणे सुधीर, नामांतर लढा एक शोधयात्रा, परिवर्तन पब्लिकेशन्स, औरंगाबाद, १९९६.

३. पाटील वा.भा., संशोधन पद्धती, प्रशांत पब्लिकेशन्स, पुणे.

४. पाठक अरुणचंद्र (का. संपा.), महाराष्ट्र राज्य गॅझेटियर, लातूर जिल्हा दर्शनिका, खंड ८ मुंबई, २००८.

५. मानकर स्नेहलता सोनबाजी, नामांतराचे विस्थापित, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, २००८.

६. मांजरे रामकिशन, भारतातील सामाजिक चळवळी, अरुणा प्रकाशन, लातूर, २००९.

७. मोरे विठ्ठल, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष क्रांतीच्या दिशेने आगेकूच, जनशक्ती प्रकाशन, मुंबई, २००६.

८. लोखंडे चंद्रशेखर, हैद्राबाद मुक्ती संग्राम का इतिहास, आर्य धर्मार्थ ट्रस्ट, २००४.

९. वाघमारे जनार्दन, बदलते शिक्षण: स्वरूप आणि समस्या, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २००९.

संशोधक विद्यार्थी

श्री. पांचाळ दत्तात्रय अंबादास

(एम.ए. सेट एम.एड.सेट)
मु. पो. शिवली ता. औसा जि. लातूर

संशोधन मार्गदर्शक

डॉ. सुरेश नांदे

(एम.ए.एम. फिल. पीएच. डी.)
इतिहास विभागप्रमुख
शिवाजी महाविद्यालया रेणापूर जि.लातूर